SNBP International & Senior Secondary School, Chikhali, Pune.
Affiliation No. 1130703
Academic session 2024-25
NOTES (TERM-2)

Std. : 5th Subject: Marathi
Prepared by: Pallavi Surve पाठ १२. आजीची छान युक्ती

---

**पूर्व उपक्रम -** तुमच्या आजी विषयी पाच ते सात ओळीत माहिती लिहा.

**शब्दार्थ**

१. अबोल - न बोलणारी २.टिपणी - नोंद

३.चिंता – काळजी ४.उज्वल - उजळ ५.बागुलबुवा - भिती

**वाक्यप्रचार**

१. हरवून जाणे - लक्ष नसणे , विचारात गढून जाणे

२.वेळ नसणे - ताळमेळ नसणे

३.काळजीचे ओझे कमी होणे - काळजी मिटणे

**अ) पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१. नीरजाच्या आईला चिंता का वाटू लागली ?

उत्तर - नीरजा घरी असल्यावर एकदम अबोल होऊन बसत असे .अभ्यासाबद्दल काही सांगत नसे ,काहीच बोलत नसे, जेवतानाही ती एकटीच आहे असे वाटत होते हे पाहून नीरजाच्या आईला चिंता वाटू लागली.

२. नीरजाने आजीला तिचा काय त्रास सांगितला ?

उत्तर - नीरजाने आजीला ती फार गोंधळून गेली आहे, तसेच तिला अभ्यास कसा करायचा ते कळत नाही ,अभ्यासाचा विषयांचा आणि वेळेचा मेळ तिला जमत नाही .हा त्रास तिला होत आहे असे आजीला सांगितले.

३. आजीने नीरजाला अभ्यासासाठी कशी जागा निवडायला सांगितली?

उत्तर-आजीने नीरजाला अशी एक जागा जसे आवडती खोली, एखादा कोपरा, खिडकी, किचन मधील टेबल आणि आवडती खुर्ची जिथे अभ्यास छान होईल व मन एकाग्र होण्यास मदत होईल अशी जागा निवडायला सांगितली.

४. आजीने अभ्यासाचे नियोजन कसे करायला सांगितले?

उत्तर- एका वहीमध्ये पुढील आठवड्यात करायच्या अभ्यासाचे नियोजन, वेळापत्रक लिहून त्याप्रमाणे अभ्यास होतो की नाही हे पाहायचे. असे अभ्यासाचे नियोजन आजीने करायला सांगितले.

५. आजीने नीरजाला कोणता विश्वास दिला?

उत्तर- परिश्रम आणि वेळ हे साधले की आपल्या पदरात यशदायी असे रसाळ फळ नक्कीच पडणार ,असा विश्वास आजीने नीरजाला दिला.

**आ) कोण कोणास म्हणाले ते लिहा.**

१. "आता तुम्हीच नीरजा बरोबर बोला, तरच आपल्याला कळेल तिची अडचण काय आहे ते!"

उत्तर- नीरजाची आई आजीला म्हणाली.

२."आजी मी फार गोंधळून गेले आहे ."

उत्तर-नीरजा आजीला म्हणाली.

३." मला सांग नीरजा तू अभ्यास कसा करतेस ?"

उत्तर-आजी नीरजाला म्हणाली.

४." माझा आणखी एक प्रॉब्लेम आहे ,आजी."

उत्तर- नीरजा आजीला म्हणाली.

५. परिश्रम आणि वेळ "time and efforts" हे साधले की आपल्या पदरात यशाचे असे रसाळ फळ नक्कीच पडणार-

उत्तर- आजी नीरजाला म्हणाली.

**इ) वाक्यप्रचाराचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा**.

१. हरवून जाणे - मग्न होणे

माझी ताई अभ्यास करताना त्यातच हरवून जाते.

२.मेळ नसणे - भान नसणे ,सांगड नसणे .

कोणत्याही संघात खेळाडूंचा मेळ नसेल तर विजय मिळू शकत नाही.

**इ(विरुद्धार्थी शब्द लिहा .**

१.अबोल X बोलका २.सोपं X कठीण ,अवघड

३. लक्ष X दुर्लक्ष ४.आवडती X नावडती

**उ)शब्दांचे वाक्य तयार करा.**

१. मित्रा - अरे मित्रा ! परीक्षेतील यशाबद्दल तुझे खूप अभिनंदन !

२. आंबा - आंबा हे फळ लहानांपासून मोठ्यांपर्यंत सगळ्यांनाच आवडते.

३. छान - दिवाळीला ताईने खूप छान रांगोळी काढली होती.

४. खरे - नेहमी खरे बोलावे.

५.अभ्यास - शाळेतून दिलेला अभ्यास वेळेवर पूर्ण केला पाहिजे.

**ऊ) पाकळ्यांमधील अक्षर वापरून नवीन शब्द तयार करा.**

माई माता साई भाई मासा भाता .

S.TEACHER HOD COORDINATOR PRINCIPAL